Pune Police

# प्रेस नोट दिनांक १६/०१/२०१८

## मोक्क्यामधील आंबेजोगाई पो.स्टे.चा चैन स्नॅचिंग करणारा फरारी गुन्हेगार व त्याचा एक साथीदार हे युनिट-१, गुन्हे शाखा पुणे शहरच्या जाळ्यात

पुणे शहरात मागील काही दिवसात चैन स्नॅचिंगच्या गुन्हयांमध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेने मा. पोलीस आयुक्त सो. पुणे यांनी सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा, युनिट-१, पुणे शहर कडील अधिकारी व कर्मचारी यांनी चैन स्नॅचिंग चोरीतील सराईत गुन्हेगारांना पकडण्यासाठी तपास सुरू केला असता, पोलीस कर्मचारी सचिन जाधव व प्रशांत गायकवाड यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत खबर मिळाली होती की, पुणे शहर भागात वेगवेगळया पोलीस स्टेशनचे हद्दीत चैन स्नॅचिंगचे गुन्हे करणारे गुन्हेगार मोठया प्रमाणात गुन्हे करीत आहेत.

त्याअनुषंगाने चैन स्नॅचिंगचे सराईत गुन्हेगारांचा शोध घेत असतांना आरोपी नामे १) जाफर फकरू ईराणी, वय २८, रा. गल्ली नं. २७, सय्यदनगर, महंमद वाडी रोड, हडपसर, पुणे व २) जावेद/सादीक इबादत अली जाफरी, वय २०, रा. वार्ड नं. ४८, रेल्वे स्टेशन जवळ, भोपाळ, व मच्छीवाडा, भुसावळ, महाराष्ट्र, व अंमळनेर रेल्वे स्टेशनजवळ, जळगांव महाराष्ट्र सध्या रा. गल्ली नं. २७, सय्यदनगर, महंमद वाडी रोड, हडपसर, पुणे हे दोघे गल्ली नं. २७, सय्यदनगर, महंमद वाडी रोड, हडपसर, पुणे येथे सार्वजनिक रोडवर उभे असल्याची खात्रीशीर माहिती प्राप्त झाली होती. सदर माहितीचा आशय श्री.नितीन भोसले पाटील, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, युनिट-१, गुन्हे शाखा, पुणे शहर यांना कळवुन, त्यांनी पुढील कारवाई करणेकामी योग्य ते मार्गदर्शन करुन आदेशीत केल्याने पोलीस अधिकारी व स्टाफ, यांचे मदतीने सापळा रचुन उपरोक्त नमुद आरोपी यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास हर्षल कदम पोलीस उप-निरीक्षक हे करीत आहेत.

**सदर आरोपींना विश्वासात घेवून त्यांचेकडे अधिक तपास करता आरोपी क्रं. १ व २ यांनी कोथरुड, चतु:श्रृंगी, वाकड, अंलकार पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये चैन चोरीचे ०८ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामध्ये सन २०१८ चे ०५ गुन्हे व २०१७ मधील ०३ गुन्हे आहेत. अटक आरोपींचे ताब्यातुन १४८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे ४,५०,०००/- रु.कि.चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

उपरोक्त नमुद गुन्हेगार हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन आरोपी क्रं. १) जाफर फकरू ईराणी, याचेवर या अगोदर एन.डी.पी.एस. कायदया अंतर्गत गुन्हा दाखल आहे व आरोपी क्रं. २) जावेद/सादीक इबादत अली जाफरी, याचेवर **एकुण २३ चैन स्नॅचिंगचे गुन्हे** दाखल असून तो बिड जिल्हयातील आंबेजोगाई पोलीस स्टेशनला मोक्का केस मध्ये मागील एक वर्षापासून वॉंटेड आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो., पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक, हर्षल कदम, दिनेश पाटील, पो.ना. सचिन जाधव, प्रशांत गायकवाड, श्रीकांत वाघवले, इरफान मोमीन, तुषार खडके, सुधाकर माने, मोहन येलपले, पो.हवा. राजु पवार, प्रकाश लोखंडे, मेहबुब मोकाशी, अशोक माने, रिजवान जिनेडी, उमेश काटे, सुभाष पिंगळे, गजानन सोनुने, इम्रान शेख, यांनी केली आहे.




गुन्हे शाखा,
युनिट १,
ची कामगिरी